दै. सकाळ
दि. 10/06/2024

# डॉ. बापूजी साळुंखे यांना अभिवादन

**कोल्हापूर :** जुना बुधवार पेठ येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम झाला. संस्थेचे आजीवसेवक श्रीराम साळुंखे, मुख्याध्यापक जे. आर. जोशी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन केले. जे. आर. जोशी यांनी डॉ. साळुंखे यांच्या याविषयी माहिती सांगितली. तसेच साळुंखे यांनी डॉ. साळुंखे यांनी संस्था उभारणीसाठी दिलेल्या योगदानाविषयी माहिती दिली. विद्या पाटील, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका उज्ज्वला जाधव, पर्यवेक्षक बी. जे. सावंत, सांस्कृतिक विभागप्रमुख डी. व्ही. वाडीकर, विद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी, उपस्थित होते. ए. के. कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. एस. आय. चौगुले यांनी आभार मानले.

10/06/2024

10-4-2024

लोकमत

कोल्हापूर, सोमवार, १० जून २०२४

# शिक्षकांनी वेळापत्रकातच अडकू नये

## दत्तात्रय वारे : डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** नवीन शैक्षणिक धोरणात सर्वांना शिक्षण, कौशल्याधारित शिक्षण, गुणवत्तापूर्ण, परवडणारे शिक्षण आणि समाजाप्रती उत्तरदायित्वाची भावना या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्यामळे शिक्षकांनी वेळापत्रकात न अडकता सदैव विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी तत्पर असायला हवे, असे मत वाबळेवाडी शाळेचे जनक, प्रयोगशील शिक्षक दत्तात्रय वारे यांनी रविवारी व्यक्त केले.

कोल्हापुरातील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्यावतीने शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त 'नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांची भूमिका' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

वारे म्हणाले, स्वाभिमान हा माणसाला संघर्षातून व सत्कर्मातून मिळत असतो. मन, बुद्धी आणि शरीर एकत्र आल्याशिवाय प्रभावी शिक्षण होत नाही. शिक्षकांनी अध्यापनात प्रयोगशीलता जपली पाहिजे.



शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात दत्तात्रय वारे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. आर. व्ही. शेजवळ, शुभांगी गावडे, नामदेवराव कांबळे, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, एस. एम. गवळी, कौस्तुभ गावडे, श्रीराम साळुंखे उपस्थित होते.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांचा वारसा मोठा आहे. महाराष्ट्राला वैचारिक वळण देण्याचे काम डॉ. बापूजी साळुंखे आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने केले आहे. बापूजींचा विचार शिक्षकांनी अध्यापनात उतरवणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. यावेळी संस्था उपाध्यक्ष नामदेवराव कांबळे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, डॉ. आर. व्ही. शेजवळ, एस. एम. गवळी, कौस्तुभ गावडे, श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख उपस्थित होते. अभयकुमार साळुंखे म्हणाले, विद्यार्थ्याला घडविणे हे प्रत्येक शिक्षकाचे उद्दिष्ट असायला हवे. यावेळी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले. महेश हिरेमठ व सहकाऱ्यांनी संस्था प्रार्थना व भक्तिगीते सादर केली. प्रा. डॉ. कविता तिवडे व प्रा. गीतांजली साळुंखे यांनी सूत्रसंचालन केले. एस. एम. गवळी यांनी आभार मानले. दुपारच्या सत्रात मुख्याध्यापकांसाठी चर्चासत्र झाले.

10/06/24

10-4-2024

पुण्य नगरी | सोमवार, १० जून २०२४

# डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्राला वैचारिक वळण दिले

## दत्तात्रय वारे : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची १०६ वी जयंती उत्साहात

**कोल्हापूर :** कोणत्याही राष्ट्राचे भविष्य हे शैक्षणिक विचारावर अवलंबून असते. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांचा वारसा मोठा आहे. महाराष्ट्राला वैचारिक वळण देण्याचे काम शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने केले. बापूजींचा विचार शिक्षकांनी अध्यापनात उतरवणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा, वाबळेवाडीचे जनक आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जालिंदरनगर, ता. खेड, जि. पुणेचे मुख्याध्यापक दत्तात्रय वारे यांनी केले.



**कोल्हापूर :** 'नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांची भूमिका' या विषयावर बोलताना प्रमुख पाहुणे दत्तात्रय घारे. व्यासपीठावर कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे आदी.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या १०६ व्या जयंतीप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून 'नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांची भूमिका' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

वारे म्हणाले, प्रत्येक कर्तृत्ववान व्यक्तीमागे एक शिक्षक असतो. त्यामुळे शिक्षकांनी आपली कर्तव्ये जपली पाहिजेत. शिक्षकाने वेळापत्रकात न अडकता सदैव विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी तत्पर असायला हवे.

अध्यक्षीय भाषणात कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी बहुजन समाजाला शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची उभारणी केली. शिक्षणातील संधी आणि आव्हाने ओळखून बापूजींनी कार्य केले. या शिक्षणयज्ञात बापूजींनी अव्याहतपणे कार्य केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. महेश हिरेमठ व सहकाऱ्यांनी संस्था प्रार्थना व भक्तीगीते सादर केली. यावेळी संस्था उपाध्यक्ष नामदेवराव कांबळे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, जिल्हा विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी केले. पाहुण्यांची ओळख संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी करुन दिली. आभार संस्थेचे सहसचिव (अर्थ) एस. एम. गवळी यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. कविता तिवडे व प्रा. गीतांजली साळुंखे यांनी केले.

सकाळ
सोमवार, १० जून २०२४




**कोल्हापूर** : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानात बोलताना दत्तात्रय वारे. शेजारी प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, प्राचार्या शुभांगी गावडे, नामदेव कांबळे, प्राचार्य अभयकुमार साळुंखे आदी.

# बापूजी साळुंखे यांनी राज्याला वैचारिक वळण दिले

## दत्तात्रय वारे; जयंतीनिमित्त व्याख्यान

कोल्हापूर, ता. ९ : शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांचा वारसा मोठा आहे. महाराष्ट्राला वैचारिक वळण देण्याचे काम बापूजी आणि स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने केले, असे वाबळेवाडी (पुणे) येथील अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळेचे जनक दत्तात्रय वारे यांनी सांगितले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त 'नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांची भूमिका' या विषयावर ते आज बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

वारे म्हणाले, 'कोणत्याही राष्ट्राचे भविष्य हे शैक्षणिक विचारांवर अवलंबून असते. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विचारांची प्रक्रिया शिक्षणातून उभी राहते. प्रत्येक कर्तृत्वावान व्यक्तीच्या मागे एक शिक्षक असतो. त्यामुळे शिक्षकांनी कर्तव्ये जपली पाहिजेत. नवीन शैक्षणिक धोरणांची योग्य अंमलबजावणी केल्यास कौशल्याधारित विद्यार्थी घडविता येतो. शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे विचार शिक्षकांनी अध्यापनात उतरवणे ही त्यांना खरी आदरांजली ठरेल.'

प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, 'बापूजींच्या विचार व कार्याचा वारसा आत्मसात करून विद्यार्थी घडवावेत व संस्थेचा नावलौकीक वाढवावा.' दुपारच्या सत्रात मुख्याध्यापकांसाठी चर्चासत्र झाले. यावेळी संस्था सचिव प्राचार्य शुभांगी गावडे, उपाध्यक्ष नामदेव कांबळे, श्रीराम साळुंखे, हितेंद्र साळुंखे आदी उपस्थित होते. सहसचिव प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी प्रास्ताविक केले. मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी परिचय करून दिला. सहसचिव एस. एम. गवळी यांनी आभार मानले.